Established: June 1985

"ज्ञान, विज्ञान आणि मूल्यसंस्कार यासाठीचे शिक्षणमंदिर"

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

SHRI SANT GADGEBABA MAHAVIDYALAYA, KAPASHI

TAL - SHAHUWADI, DIST - KOLHAPUR

Affiliated to Shivaji University, Kolhapur

NAAC Reaccredited Grade- 'B', ISO 9001: 2015 Certificate No.18106153819

Reg.No.SU/Affi/ New College/10816 Date:11-9-1984 Ph.:(O) 02329-254642 / 9890044600 (Prin)

Founder	President	Executive Chairman	I/C Secretary
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe B.A., B.T., D.Lit.	**Hon'ble. Chandrakant (Dada) Patil** Minister for Higher and Technical Education, Textile, and Parliamentary Affairs	**Prin. Abhaykumar Salunkhe** M.A.	**Prin. Dr. Milind S. Hujare** M.Sc., Ph. D.

I/C Principal
Dr. S. R. Kattimani
M.A., B.Ed., NET, SET, Ph. D. (History)
M.B.A., B.J.M.S., M.A. (Eng), D.S. M.

Email Id: ssgmk@rediffmail.com **NAAC Grade "B"**

माहितीचा अधिकार कायद्याअंतर्गत नमुद केलेली १७ प्रकारची माहिती पुढीलप्रमाणे आहे

१) खात्याच्या / संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्यांची संपूर्ण माहिती :

श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी, तालुका- शाहूवाडी, जिल्हा- कोल्हापूर ४१६२१४ हे महाविद्यालय श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेव्दारे चालविले जाते. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य म्हणून डॉ. एस. आर. कट्टीमणी हे २८.०७ .२०२६ पासून कार्यरत आहेत. या महाविद्यालयात B.A.या पारंपारिक अभ्यासक्रमा बरोबरच M.A.- Marathi, Hindi, English, Economics, Political Science, Sociology, History, Geography इत्यादि शिवाजी विद्यापीठाचे दूरस्थ विभागातील पदव्युत्तर अभ्यासक्रम महाविद्यालयात उपलब्ध आहेत.

कामकाजाची व्यवस्था :

ॲकेडेमिक व ॲडमिनिस्ट्रिटिव्ह प्रमुख : प्राचार्य डॉ. एस. आर. कट्टीमणी

मुख्य लिपिक : श्री. प्रकाश एम. पाटील

वरिष्ठ लिपिक: रिक्त

कनिष्ठ लिपिक: रिक्त

कामकाज विद्यापीठ कायदा २०१६ व UGC च्या नियमावली प्रमाणे चालते.

२) अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्यांचे अधिकार :

प्राचार्य : सर्व ॲकेडेमिक व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कामावर देखरेख ठेवणे.

मुख्य लिपिक : सर्व नॉन टिचिंगच्या कार्यालयीन कामावर देखरेख व कार्यपूर्तता करवून घेणे.
तसेच सर्व आर्थिक व्यवहारांचे संचालन.

३) निर्णय घेण्याचे अधिकार व जबाबदारी :

प्राचार्य : सर्व ॲकेडेमिक व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह कामावर देखरेख ठेवणे.

मुख्य लिपिक : सर्व नॉन टिचिंगच्या कार्यालयीन कामावर देखरेख व कार्यपूर्तता करवून घेणे.
तसेच सर्व आर्थिक व्यवहारांचे संचालन.

४) कामकाजाची कार्यपद्धती :

महाराष्ट्र शासनाच्या, विद्यापीठाच्या, UGC च्या व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कामकाज चालविले जाते.

५) अधिकारात येणारे नियम, परिपत्रके, सुचना इ.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६, यु.जी.सी. गाईडलाईन्स तसेच वेळोवेळी निर्गमित होणारे व्यवस्थापन, शासन व विद्यापीठ याच्या आदेशानुसार कामकाज चालते.

६) खात्याच्या अखत्यारीत येणारी कागदपत्रे :

महाराष्ट्र शासनाने व विद्यापीठाने पाठविलेली परिपत्रके व त्यानुसार केल्या जाणाऱ्या पत्रव्यवहाराची कागदपत्रे, प्रवेशप्रक्रिया, अकौंट, ऑडीटींग, वेतन व वेतनेतर अनुदान निर्धारण, परीक्षा व शाखेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व कामकाजाची कागदपत्रे.

७) सल्ला मसलतीसाठीची यंत्रणा व जनतेसाठी मार्गदर्शनाची कार्यपद्धती :

शाखेचे काम सुरळीत होणेसाठी १) College Development Committee (महाविद्यालय विकास समिती) २) Internal Quality Assurance Cell (IQAC) अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ३) माजी विद्यार्थी संघटना यांचेशी आवश्यक त्यावेळी बैठका घेतल्या जातात. विविध समितीच्या निर्णयानुसार यामध्ये शासनाचे काही अधिकारी व समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींचा देखील समावेश केलेला आहे.

८) जनतेसाठी खात्याअंतर्गत स्थापण्यात आलेल्या तसेच Industry व Academic Expert समित्या व त्यांची कार्यपद्धती :

एन.एस.एस., एन.सी.सी., सांस्कृतिक विभागामार्फत जनतेसाठी समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्यांची कार्यपद्धती विद्यापीठ, शासन व संस्था यांच्या आदेशाप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणे चालते.

९) महाविद्यालयातील अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांच्या नावाची सूची :

वेबसाईटवर अन्यत्र सविस्तर सूची दिली आहे.

१०) वरिष्ठ महाविद्यालयाच्या, कनिष्ठ महाविद्यालय, शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांची मासिक प्राप्ती/भरपाई इ.

वेबसाईटवर अन्यत्र सविस्तर दिली आहे.

११) महाविद्यालयाच्या विनियोगासाठी वेगवेगळे उपलब्ध निधी, योजना, खर्चाच्या तरतूदी व वापर:

वेतनासाठी निर्धारित केलेली रक्कम ही शासनाकडून मिळत असते. शासनाच्या नियमानुसार महाविद्यालयास वेतनेत्तर अनुदान दिले जाते. प्रवेशाच्या वेळी शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांकडून शिक्षण व अन्य शुल्क जमा केले जाते व त्यावर खर्चाची तरतूद केली जाते.

१२) शिष्यवृत्ती / सवलती उपलब्ध असल्यास ती माहिती, कार्यक्रम व लाभार्थीबाबत माहिती : आहे.

१३) सवलती, परवाने, अधिकार याबाबत जे अधिकार आहेत ती माहिती :

विद्यार्थी सहाय्य निधीतून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना बस पास, परीक्षा फीसाठी, खेळासाठी, कपड्यासाठी आर्थिक मदत शिवाय ग्रंथालयातून हुशार गरीब खेळाडू विद्यार्थ्यांना वर्षभर विनामुल्य पुस्तकांचे संच पुरविले जातात. यासाठी प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन केलेली आहे. त्यांनी गरीब विद्यार्थ्यांची माहिती घेऊन आर्थिक मदतीचा निर्णय घेतला जातो.

१४) इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली माहिती :

महाविद्यालयासंबंधीची आवश्यक ती सर्व माहिती वेबसाईट www.ssgmkapashi.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५) नागरिकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा, कार्यालयाची वेळ, लायब्ररीची माहिती इ.

महाविद्यालयाचे माहितीपत्रक व महाविद्यालयामार्फत राबवल्या जाणाऱ्या अनेक उपक्रमासंबंधी प्रसिद्धी दैनिक वर्तमानपत्रातून दिली जाते व गरजेनुसार पत्रव्यवहार केला जातो. त्याचबरोबर महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटना कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून महाविद्यालयाच्या उपक्रमासंबंधी माहिती दिली जाते. महाविद्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये (सोमवार ते शनिवार ९.०० ते ४.३०) ज्या नागरिकांना जी माहिती पाहिजे असेल ती आमच्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वेळोवेळी करून देतात.
ग्रंथालयाची वेळ सोमवार ते ९.०० ते ४.३० आहे. ग्रंथालयातील ग्रंथ विषयानुरूप व भाषेनुरूप विभागणी करून वेगवेगळ्या कपाटात ठेवलेले आहेत. हिंदी, इंग्रजी व मराठी भाषेतील दैनिके उपलब्ध आहेत. सर्व संबंधीत या वेळेत त्याचा उपभोग घेतात. अन्य माहिती महाविद्यालयाच्या www.ssgmkapashi.org वर उपलब्ध आहे.

१६) माहिती अधिकाऱ्यांची नांवे, पदनामे व अन्य माहिती :

१) प्राचार्य, डॉ. एस. आर. कट्टीमणी, माहिती अधिकारी

२) श्री. प्रकाश एम. पाटील, सहा. माहिती अधिकारी

३) प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कार्याध्यक्ष, प्रथम अपीलीय अधिकारी (प्रशासकीय माहितीसाठी)

४) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर (वरिष्ठ महाविद्यालयासाठी) प्रथम अपीलीय अधिकारी

५) शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर (कनिष्ठ महाविद्यालयासाठी) प्रथम अपीलीय अधिकारी

१७) संस्थेने निश्चित केलेली अन्य संबंधित माहिती (दरवर्षी अद्ययावत करून) :

वेगवेगळ्या शासकीय खात्यांनी मागितलेली माहिती ज्या त्या वेळेला अद्ययावत करून त्या त्या खात्याला पुरविली जाते.

श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी ★ स्थापना जून-१९८५ ★ ता. शाहूवाडी

डॉ. एस. आर. कट्टीमणी
प्र. प्राचार्य
श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर